# An Homage to Kaku alias Mrs. Asha V. Joshi

काकूंचे (विकासच्या आई, सौ. आशा वासुदेव जोशी) ९ ऑगस्ट २०१९ च्या मध्यरात्री निधन झाले. गेले काही महिने त्यांची प्रकृती तितकीशी बरी नव्हती, आणि किडनीच्या आजारामुळे त्यांची तब्येत झपाट्याने खालावत गेली. त्यांचे वय ८४ वर्षे होते.

२०१९ हे सालच उजाडले एकापाठोपाठ एक धक्कादायक बातम्या देत. अगदी जवळच्या लोकांच्यासंबंधीच्या या बातम्या - गंभीर आजारांच्या, अपघातांच्या, मृत्यूच्या - मन विषण्ण करत गेल्या. मानवी जीवनाची क्षणभंगुरता व अनिश्चितता, सुखदु:खांच्या खेळात हेलकावे खाणारा प्रत्येक दिवस अशा गोष्टींची जाणीव प्रबळ करत गेल्या. काकूंचे निधन हा माझ्यासाठी २०१९ चा नीचांक होता. "काकूंचा मानसपुत्र" असे माझे संबोधन केतकी (विकासची भाची) चेष्टेत बऱ्याचदा करायची. पण ती केवळ चेष्टा नव्हती. त्यात बरेच सत्य होते. काकूंनी माझ्यावर पुत्रवत प्रेम केले, माया केली. आमचे नाते अत्यंत जिव्हाळ्याचे, स्पेशल असे होते. त्याचे वर्णन करण्यासाठी माझ्यापाशी योग्य शब्द नाहीत. स्पेशल हाच एक गरीब आणि अमराठी शब्द मला सुचतोय! या नात्यात मला पुत्राची जबाबदारी नव्हती, माझ्याकडून काहीही अपेक्षा नव्हत्या, मला मात्र पुत्राचे अधिकार होते. आमची प्रत्येक भेट अवर्णनीय होती, स्पेशल होती. त्यांच्या पुण्यातल्या घराच्या दाराशी मला आलेला पाहिल्यावर काकूंचा चेहरा एका अनामिक स्नेहाने उजळायचा. तो उजळलेला चेहरा पाहिल्यावर माझे हृदय भरून यायचे, सर्व चिंता, विचार गळून जायचे, मी जगाचा राजा असल्यासारखे वाटायचे. आणि मग पुढचे तास-दोन तास गप्पा, पोहे किंवा खिचडी, आणि नुसताच शांत बसून अनुभवलेला काका-काकूंचा सात्विक सहवास यात कसे गेले कळायचे नाही.

काकूंचा माझा परिचय १९७८ पासूनचा. त्या वर्षी माझी आणि विकासची दहावीच्या एका "विद्यार्थी सत्कार समारंभात" पहिल्यांदा भेट झाली. त्यानंतर मी विकासच्या कोल्हापुरच्या घरात एक-दोनदा येऊन राहिलोही. त्यावेळी काकूंच्या प्रेमळ स्वभावाचा प्रथमपरिचय झाला. त्यांच्या पाककौशल्याचा आनंदही अनुभवायास मिळाला. पुढे १९८७-८८ च्या सुमारास विकास आणि मी अमेरिकेत सिरेक्यूज नावाच्या गावी शिकायला होतो, तेव्हा काका-काकू (विकासचे आईवडिल) आम्हाला भेट द्यायला आले, व काही दिवस आमच्याकडेच राहिले. तेव्हा खऱ्या अर्थाने माझी काकूंशी मैत्री व्हायला सुरूवात झाली असे म्हणता येईल. आमचा स्नेह वृद्धिंगत होत गेला. काकूंच्या हातचे सुग्रास जेवण रोज खाण्याचा बहुमोल योग मला प्राप्त झाला. (काकूंचे पाककौशल्य व त्यांची किचन मॅनेजमेंट हा एक वेगळा आणि मोठा विषय आहे. कुणीतरी त्यावर लिहून त्या रूपाने आजकालच्या हजारो संत्रस्त महिलांना दिलासा देण्याची नितांत गरज आहे). स्वैपाकासाठी लागणारे सामान आणणे इ. किरकोळ कामे मी अर्थातच उत्साहाने केली. काका-काकूंना घेऊन आम्ही बराच प्रवासही केला. न्यूयॉर्कमधील मॅनहॅटनचे रस्ते पायी तुडवले, गगनचुंबी इमारती मान दुखेपर्यंत पाहिल्या. नायगाऱ्याचे धो-धो वाहणारे पाणी पाहात पुण्यातल्या फुटक्या पाईप्समधून वाहणाऱ्या पाण्याच्या आठवणी काढल्या.

पुढे एकदोनदा काका-काकू पुन्हा अमेरिकेत आले तेव्हा त्यांचा सहवास पुन्हा मला मिळाला. तेव्हा मी Seattle या गावी होतो, व माझ्याबरोबर माझी पत्नी तनुजा व मुलेही होती. तनुजाची काका-काकूंबरोबर सिरेक्यूजपासूनची ओळख असल्याने कुणालाच संकोच वाटण्याचा प्रश्न नव्हता. खुद्द आईवडील आल्यासारखा आम्ही काका-काकूंचा सहवास enjoy केला. त्यांनी आमच्या लहानग्या मुलांचेही खूप कोडकौतुक व संभाळही केला. काकूंनी खाण्यापिण्याचे लाड करायचे व काकांकडून बौद्धिक विषयांबरोबरच विनोदी किस्से ऐकायचे असा सुयोग पुन्हा एकदा जुळून आला. आणि आमचे स्नेहसंबंध अजून दृढ झाले. माझ्या मुलीच्या - सानिकाच्या - वेळची आठवण नमूद करणे अत्यावश्यक आहे. सानिका लहान असल्याने व आम्ही दोघेही फुलटाईम job करत असल्याने आम्हाला मदतीची गरज होती. इतर कुणी येणे विविध कारणांमुळे शक्य नव्हते. मग मी काकूंना सहज विचारले. त्यांनी ताबडतोब होकार दर्शवला. एव्हढेच नव्हे, ट्रिप सुरू होण्याआधी दुर्दैवाने त्यांना एक अपघात होऊन चेहऱ्यावर (व कदाचित इतरत्रही) चांगलीच दुखापत झाली. पण तरीही त्यांनी ट्रिप रद्द करण्याचा विचारही दर्शवला नाही व आमच्या मदतीसाठी येऊन हजर झाल्या. याला पुत्रवत प्रेम म्हणायचे नाही तर कशाला!!

काकूंचे स्मरण झाले की पहिला शब्द मनात येतो तो म्हणजे diginity. Kaku was a personification of dignity. त्यांचे आयुष्य नक्कीच इतरांसारखे उंचसखल होते, चढाव व उतारांनी भरलेले होते. ज्यातल्या काहींचे मलाही ज्ञान आहे. पण काकूंच्या वागण्यात, चेहऱ्यावर, बोलण्यात कुठेही दुःखद क्षणांची व्यथाही दिसायची नाही आणि सुखाचा, यशाचा अभिमानही दिसायचा नाही. त्यांची मान कधी गर्वाने ताठलेली दिसली नाही - जरी त्यांचे आयुष्य असमान्य यशाच्या अनेक प्रसंगांनी समृद्ध आहे - आणि अडचणींच्या ओझ्याखाली वाकलेलीही दिसली नाही - जरी दुर्दैवाने त्यांना असामान्य अडचणींनाही तोंड द्यावे लागले. लिओनार्दोच्या मोनालिसाच्या चेहऱ्यावर जसे एक अनामिक, गूढ असे स्मित आहे, तसे काकूंच्या चेहऱ्यावर कायम एक dignified स्मित असायचे. ज्याचे कोडे मला कधीही उलगडले नाही. मी इतका जवळचा असून त्यांनी त्यांच्या समस्यांचा उल्लेख क्वचितच केला असेल. अगदी शेवटीच्या आजारपणात देखील एक-दोनदा मी त्यांना हॉस्पिटलमधे भेटलो तेव्हा सुद्धा त्यांना होत असलेल्या त्रासाविषयी न बोलता त्यांनी माझीच चौकशी सुरू केली. माझ्यासमोरच त्यांना एक-दोन उलट्या झाल्या, जीव कासावीस झाला. पण अजिबात त्रागा नाही, कुणाचा उद्धार नाही, पॅनिक बटन नाही. असे वाटावे की जीवनाच्या सर्व पैलूत - संसार, मुलेबाळे, नातवंडे, स्नेही, समाजकार्य, कला-साहित्य - या सर्वात अगदी मनापासून व अत्यंत समर्थपणे ज्या स्त्रीने स्वतःला झोकून दिले, तीच स्त्री कुठेतरी या सर्वापासून अलिप्त होती की काय?!

काकूंचे स्मरण झाले की दुसरा शब्द मनात उभा राहतो तो म्हणजे सौंदर्य. काकू स्वतः सुंदर तर होत्याच. त्यांचा सर्व परिसर, त्यांचा सहवास, त्यांचे घर, त्यांचे किचन, त्यांनी केलेले पदार्थ, त्यांच्या हालचाली - या सर्वात सौंदर्य होते, नीटनेटकेपणा होता, कलात्मकता होती. त्यांच्या पिढीचा परिणाम असेल किंवा काकूंचा स्वतःचा निर्णय असेल - मला माहित नाही, पण काकूंनी स्वतःची करीयर अशी काही केली नाही. तशी त्यांनी केली असती तर नक्कीच त्यांना creativity, originality, neatness, user experience अशा सगळ्या categories मधली corporate awards मिळाली असती यात शंका नाही. Seattle ला माझ्या घरी असताना मला आठवतेय, काकूंनी आमच्या घराच्या interior संबंधी खूप सोप्या पण परिणामी उठावदार सूचना दिल्या, अर्थात कसलाही आग्रहीपणा न करता. तसेच त्या रोज नाना प्रकारचे पदार्थ बनवायच्या, पण किचनमधे गेले की वाटायचे की त्यांनी हे पदार्थ बाहेरून मागवलेत की काय! कारण कुठेही स्वयंपाक झाल्याच्या खुणा नसायच्या! सगळे काही व्यवस्थित जागच्या जागी, चकाचक, आणि सुबक.

काकूंचे स्मरण झाले की तिसरा शब्द मनात उभा राहतो तो म्हणजे kindness. मला स्वतःला त्यांचे अलोट प्रेम तर मिळालेच. पण त्यांच्याकडे येणारा, त्यांच्या सहवासातला प्रत्येकजण त्यांच्या मायेचा धनी ठरला. काकूंच्या मनात व वागण्यात आपपर भाव कधीच दिसला नाही. विकासमुळे मी, मग माझ्यामुळे माझे मित्र, मग त्यांचे कुणी असतील ते - असे सर्व काकूंच्या स्नेहविश्वात समाविष्ट होत गेले. मग त्यांचे "विकास" कनेक्शनदेखील गरजेचे राहिले नाही. काकूंचा kindness पूर्णपणे निरपेक्ष होता, हेतुविहीन होता, त्यांच्या हृदयात उगम पावलेला होता. कुणी आपली चौकशी करावी, गावात आले की किमान फोन तरी करावा, एव्हढी अपेक्षाही त्यात नसायची. "असेल तो किंवा ती तिच्या अडचणीत व्यग्र" अशी त्यांची प्रत्येकाबाबत सहानुभूतीपूर्ण भावना असायची. वर उल्लेख केलेली काकूंची dignity केवळ स्वतःपुरती नव्हती, ती इतरांनाही संरक्षण द्यायची. विशेषतः मुलींच्या/स्त्रियांच्या बाबतीत काकूंचे understanding कुठल्याही liberal विचारांच्या स्त्रीलाही लाजवेल इतके उदार व protective होते.

काकूंचे स्मरण झाले की - हे वाक्य आता इथेच अर्धवट सोडतो. कारण काकूंचे स्मरण मला करावे लागत नाही, किंवा असे अधुनमधुन होत नाही. त्यांची प्रतिमा, त्यांचा चेहरा, त्यांचे व्यक्तिमत्व माझ्या अंतर्मनाचा कायमचा भाग झालेत. त्यांची प्रेमळ सोबत मला कायमचीच आहे.



*By: अभय जोशी (abjoshi@yahoo.com)*
*Last updated: 13 August 2019*